# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

क्रमांक :२/एनजीपी/२००३/डिफार्म-मान्यता/ 6066
दिनांक : 16 सितम्बर 2003

प्रति

प्राचार्य,
मायणी भाग शिक्षण प्रसारक मंडळ, मायणी यांचे
मायणी कॉलेज ऑफ फार्मसी,
मु.पो. मायणी, ता. खटाव, जि. सातारा ४१५ १०२.

**विषयः- शैक्षणिक वर्ष २००३-०४ साठी विना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र हा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत...**

संदर्भः- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्रमांकः मान्यता २००३ / (प्र.क्र.१४९/०३)/३/तांशि-२, दिनांक २५.०७.२००३

उपरोक्त विषयासंदर्भात आपणांस कळविण्यात येते की, शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २००३-२००४ साठी विना अनुदान तत्वावर खालील पदविका अभ्यासक्रम त्यांच्यासमोर दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र पदविका | ६० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटीचे पालन करण्याचे नोंदणकृत हमीपत्र या संचालनालयास सादर करावे लागेल तसेच संस्थाचालक व संबंधित सहसंचालक यांच्या संयुक्त खात्यात शासन जी रक्कम विहीत करेल ती भरणे संस्थेवर बंधनकारक आहे.

विहित केलेल्या अटींपैकी उरलेल्या खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून उपरोक्त नमूद केलेले अभ्यासक्रम सन २००३-२००४ पासून विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास व विद्यार्थ्यास प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून अंतिम परवानगी देण्यांत येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक टिईएम-३३८२/१११८३६/(१९०)/तांशि-१अ, दिनांक २१ मे १९८३ अन्वये विना अनुदान तंत्रशिक्षण संस्थांना शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती आपणांस बंधनकारक असतील.

३. संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व शासन व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचा-यांना देण्यांत यावे. शिक्षकवृंद व इतर कर्मचा-यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्याकडून या संचालनालयाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

४. संस्थेने औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी संस्थाचालक आणि मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात नियतठेव म्हणून रु.५.०० लाख बँक ऑफ इंडिया शाखा मायणी येथे पावती क्रमांक बीएफएस/एचओ-१२७३०९५ अन्वये दिनांक २०.०८.२००३ अन्वये ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच व्दितीय वर्षासाठी संयुक्त खात्यात रुपये ५.०० लाख भरावे लागतील.

५. आपल्या संस्थेला महाराष्ट्र शासन, तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडून वेळोवेळी विहित करण्यांत आलेले प्रवेश नियम, आरक्षण, शिक्षणशुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. सदर अभ्यासक्रमाचे शिक्षण शुल्क शासन मंजूरीप्रमाणे आकारण्यात यावे.

७. संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके इ. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याचे दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

८. या संचालनालयाने किंवा सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई किंवा त्यांच्याकडून प्राधिकृत करण्यांत आलेले अधिकारी यांस त्यांनी संस्थेचे निरिक्षण करुन त्या निरीक्षणांती संस्थेस आढळून येणा-या उणीवांबद्दल उचित कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील.

९. सदर संस्था संचालक, तंत्रशिक्षण यांच्या नियंत्रणाखाली राहिल व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडून घेतल्या जातील.

१०. संस्थेला सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची सदर अभ्यासक्रमासाठी संलग्नता घ्यावी लागेल.

११. विद्यार्थ्यांना प्रवेश देतांना त्यांच्याकडून रकमेच्या स्वरुपात कॅपिटेशन फि किंवा इतर कोणत्याही स्वरुपात देणगी स्विकारता येणार नाही तसेच प्रवेश गुणवत्तेनुसार करणे बंधनकारक आहे.

१२. शासनाने, या संचालनालयाने व सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास राहतील.

१३. संस्थेला फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी संस्थेस मान्यता नाकारल्यास संस्था बंद करावी लागेल.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती आपणांस बंधनकारक राहतील.

**( प्रा. न. बा. पासलकर )**
**संचालक**
**तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

प्रत:

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. सचिव,महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, पुणे.
४. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव सादर.
५. श्री. एन.बी. पाटील, सिस्टिम ॲनालिस्ट यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.
६. कार्यासन क्रमांक १० मुख्य कार्यालय,मुंबई.
७. निवड नस्ती.